# प्रकरण ५ वे

## उपसंहार

या प्रबंधामध्ये सोलापूरचे दैवत असलेले श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर यांचे चरित्र तत्वज्ञान व वारसा याची चर्चा केलेली आहे. सिद्धरामेश्वरांचे चरित्र अदभूत आहे. सोलापूरातील सर्वच जातिधर्मांना त्यांच्याविषयी आदर व श्रद्धा आहे. त्यामुळेच सदर संशोधिकेने हा विषय संशोधनासाठी घेतला आहे.

पहिल्या विभागात वीरशैव धर्माविषयीची माहिती दिली असून त्याचे नियम, त्यांचे तत्व इत्यादीची माहिती स्पष्ट केलेली आहे. शैव आणि वीरशैव यांच्यातला फरक, लिंगधारणा, स्थापित लिंगे याविषयीची माहिती गरजेची होती. शिव आणि शक्ती यांच्याविषयीची कल्पना यात स्पष्ट आहे. वीरशैवांचे प्रकार, षट्स्थल, लिंगांगसामरस्य तर सर्व जीवांना महत्त्वाचे असल्याने मोक्षाला अतिशय महत्व दिले गेले आहे.

अष्टावरण – वीरशैव तत्वज्ञानात अष्टावरणांमध्ये सर्वात जास्त महत्व गुरूला दिले आहे. गुरुमुळे वीरशैवाला मार्ग मिळतो. श्रेयमार्ग किंवा प्रेयमार्ग हे ठरविता येते. अष्टावरणांना साधनेची अंगे म्हटले आहे. अष्टावरणातील गुरू,लिंग, जंगम ही आवरणे पूजनीय आहेत. विभूती, रुद्राक्ष, मंत्र ही पूजेची साधने होत आणि पादोदक व प्रसाद ही पूजेची फळे आहेत. वीरशैवात अष्टावरण व षटस्थलांना जसे महत्व आहे तसे पंचाचाराला महत्व दिले आहे.

आचार - म्हणजे वर्तणूक, वागणूक होय. आचार हे आचार्यापासूनच सूरू आहे, असे वीरशैवात मानले आहे. त्याप्रमाणे पाच आचार सांगितले आहेत. युगाप्रमाणे पंचपीठांत पंचाचार्यांचे जन्म होत गेले आणि कलियुगातील पंचाचार्यांची नावे सांगितली आहेत. ही पाच पीठे म्हणजे वीरशैवांची श्रेष्ठ स्थाने आहेत. ही पंचपीठे आजही अस्तित्वात असल्याने त्यांना ज्ञानपीठांचे महत्व आले आहे.

सोन्नलगी हे क्षेत्र सिद्धरामेश्वरांचे जन्मस्थान, कर्मस्थान असून पुण्यक्षेत्र आणि अभिनव श्रीशैल मानले जाते. त्यांच्या जीवन तसेच कालमानाविषयीची चर्चाही याच विभागात आहे. त्यावेळच्या राजकीय चालुक्य राजवटीची झळ कदाचित सोन्नलगीत पोचत होती. कोठेही नमूद असल्याचे आढळत नाही. पण जनमतानुसार त्यावेळेस राजा नन्नप्पा आणि राणी चामलादेवी सोन्नलगीत अधिपती असावेत. सिद्धरामांच्या जन्माविषयीचे भाकित श्री. योगीवर्य रेवणसिद्धेश्वरांनी सांगितले, ज्या रेवणसिद्धेश्वरांचे मंदिर आजही सोलापूरात आहे. हे या विभागात उल्लेखिले आहे.

विभाग दोनमध्ये रेवणसिद्धेश्वरांना निरोप देऊन, आशीर्वाद देऊन सिद्धरामेश्वरांच्या जन्माचे भाकित सांगितले, वासनारहित असलेल्या वृद्ध आईवडिलांच्या पोटी अनिमिषयोगी सिद्धरामांचा जन्म झाला. जीवन चरित्रामध्ये सर्व चमत्कारिक वाटत असले तरी ते सत्य आहे. त्यांच्या बालपणात त्यांना झालेले परमेश्वरांचे

साक्षात्कार हाही चमत्कार वाटतो. पण श्रीशैलमध्ये आजही त्याविषयी काही पुरावे मिळतात, मुका, वेडसर असणारा मुलगा परमेश्वराच्या साक्षात्कारानंतर योगी होतो. याच दुसऱ्या विभागात सोन्नलगी क्षेत्राचे म्हणजे (अभिनव श्रीशैल असलेल्या सोन्नलगीचे) सिद्धरामांचे आराध्यदैवत कपिलसिद्ध मल्लिकार्जुन आणि श्रीशैल क्षेत्राचे वर्णन व तेथील श्रीशैल मल्लिकार्जुन मंदिर याविषयी माहिती दिली आहे. श्रीशैलहून परत आल्यानंतर सोन्नलगीत उत्साहत सिद्धरामांचे स्वागत होते. अशाप्रकारे त्यांच्या कर्मयोगाला सुरुवात होते. क्षेत्र निर्माणाची कल्पना, सोन्नलगीची स्थापना इत्यादी अनेक महत्वाचे कार्य सिद्धरामांनी केले. ६८ शिवलिंगे (तीर्थ), अष्टविनायक यांची स्थापना केली. त्यांनी ६८ हजार वचने लिहिली. सिद्धरामेश्वरांच्या वचनांच्या शेवटी कपिलसिद्ध मल्लिकार्जुन असे अंकित आहे. सिद्धरामेश्वरांच्या वचनांचे शिलालेख सोलापूर जिल्ह्यात ३ ठिकाणी, उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर जवळ २, विजापूर जिल्ह्यात १०, धारवाड जिल्ह्यात ५, शिमोगा जिल्ह्यात१ आणि चित्रदुर्ग जिल्ह्यात १ असे सहा जिल्ह्यातून एकूण २२ शिलालेख सापडलेले आहेत आणि काही ठिकाणी वचने ताम्रपटावरही मिळालेली आहेत. प्रत्येक शिलालेखाच्या शेवटी कपिलसिद्ध मल्लिकार्जुन असे नमूद केलेले आहे.

स्त्रीला त्यांनी परमेश्वराचे रूप मानले आहे. सिद्धरामांच्या लग्नाविषयीची मते अनेक आहेत. कुंभारकन्येकेची आपले लग्न सिद्धरामांशी व्हावे अशी इच्छा होती. पण सिद्धारामांच्या योगदंडाशी तिचा विवाह झाला असे जनमत आहे. ते ब्रह्मचारी होते हे काही गोष्टींवरून स्पष्ट करता येते. कल्याणमधील सर्वसमानतेवर आधारलेल्या अनुभव मंटपाचे ( शून्य सिंहासनाचे पिठाचे ) उत्तराधिकारी हे ब्रह्मचारी असत. अल्लमप्रभू हे शून्यपीठाचे पहिले अधिकारी होते. हे अनेक ग्रंथांवरून समजते. शून्य पीठाचे दुसरे उत्तराधिकारी चन्नबसवण्णा होते. अनेक ग्रंथांवरून तिसरे उत्तराधिकारी सिद्धराम होते. जर शून्यपीठाचे अधिकारी ब्रह्मचारी असत तर मग सिद्धराम शून्यपीठाचे अधिकारी कसे असू शकतील. पण अनेक साधने आणि ग्रंथावरून शून्यपीठाचे तिसरे उत्तराधिकारी श्री सिद्धरामेश्वरच होते हे सिद्ध होते. मग त्यांचा विवाह, कुंभारकन्येची इच्छा इत्यादी गोष्टी सत्य असू शकतील पण सिद्धरामांशी तिचा विवाह न होता त्यांच्या योगदंडाशी झाला. तिच्या मनातील वासना दूर करण्यासाठी सिद्धरामांनी होम पेटविला आणि सर्व जीवांना जीवदान देणारे सिद्धराम यांनी तिच्या मनातील वासनांची आहुती दिली असेल, असे वाटते. या विभागात अनेक कथांचा उल्लेखही केलेला आहे.

तिसऱ्या विभागात सिद्धरामेश्वरांच्या जीवनचरित्रांचे वर्णन करणे गरजेचे होते. त्यांच्या अनमोल अशा कार्याचे वर्णन केलेले आहे. सोन्नलगीत अधिपती असणाऱ्या नन्नप्पा राजाच्या राणी चामलादेवीने दान दिलेल्या जमिनीवर सिद्धरामांनी क्षेत्र निर्माण कल्पनेने तलावाची निर्मिती केली. ही महत्वाची आणि गरजेची बाब होती. तो तलाव आजही सोलापूर शहराच्या मध्यभागी, किल्ल्याजवळील सिद्धरामेश्वरांच्या मंदिराभोवती अस्तित्वात आहे. सिद्धराम आपला वेळ योगसाधना, लोककल्याणकार्यात, वचनरचनेत आणि चिंतनात घालवीत असतानाच हे

कार्य योग्य रीतीने पार पाडीत असत. त्यांनी अड्डसष्ट शिवलिंगाची (तीर्थ) स्थापना केली. सोन्नलगीचे सदैव रक्षण व्हावे म्हणून गावाच्या सभोवती अष्टविनायकांची स्थापना करून गावाचे रक्षण केले आहे. तलावाचे काम चालू असताना अल्लमप्रभूयोगी यांचे सोन्नलगीत आगमन झाले. ही त्यांच्या जीवनातील सर्वात महत्वाची भेट असेच म्हणावे लागेल. कारण अल्लमप्रभूंच्या भेटीपूर्वी सिद्धराम स्थापित लिंगाची पूजा करीत असत. कपिलसिद्ध मल्लिकार्जुन लिंगाची स्थापना केली. म्हणजे ते शैव होते असेच म्हणावे लागेल. पण अल्लमांच्या भेटीनंतर कल्याणमधील शिव-शरणशर्णींचे सहवास सिद्धरामांना मिळाल्यामुळे त्यांच्या जीवनात अमूलाग्र असे बदल घडून आले. शरणशरणींच्या लिंगपूजेत सिद्धरामाही हळूहळू रमू लागले आणि नंतर ते इष्टलिंगाची पूजा करू लागले. म्हणजे ते वीरशैव झाले असे समजावे. कारण त्यांच्या हयातीतच त्यांनीच स्थापन केलेल्या कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिराकडे खुद्द त्यांचेच दुर्लक्ष झाले आणि म्हणूनच नंतर ते मंदिर अस्ताव्यस्त अवस्थेत पडले असावे. काळानुसार ते मंदिरही नाहीसे झाले. नंतर मुसलमानाच्या राजवटीत त्या मंदिराभोवतीच किल्ला बांधला गेला. त्यामुळे ते मंदिर आतच राहिल्याने बाहेरील लोकांना तेथे जाता येईना.

कल्याण क्रांतीनंतर श्रीसिद्धरामांनी समाधी घेण्याचे ठरविले. तसे पाहिल्यास सिद्धरामांचे चरित्र थोड्या अधिक प्रमाणात इतिहास आणि संस्कृतीला धरून का नसेना पण अबालवृद्धांना माहिती असतेच. सिद्धराम हे सोन्नलिगीचे, श्रीशैलची यात्रा केलेले मल्लिकार्जुनाचे एकनिष्ठ व निस्सीम भक्त. कर्णदेवाची, आपल्या राज्याभिषेकाला सिद्धरामांना घेऊन जावे ही इच्छा असफल झाली. सिद्धराम योगीकुल चक्रवर्ती होते. म्हणून त्यांची समाधी तत्कालीन योग्यांच्या समाधी परंपरेस धरून होती. म्हणून सिद्धरामांनी आपले कुलदैवत, आपण स्वत: स्थापलेल्या कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिराच्या परिसरात समाधी घेतली असावी. तर ते आताचे मंदिर किंवा योगसमाधी या दोन्हीपैकी एका ठिकाणी आहे. पण या परिसरातच त्यांची समाधी आहे हे स्पष्ट होते.

चौथ्या विभागात सिद्धरामांच्या वचन साहित्यातून त्यांची शिकवण, त्यांचे उपदेश तसेच त्यांचे तत्वज्ञान स्पष्ट होते. त्यांनी लिहिलेली ६८ हजार वचने, संपूर्ण, सर्वच्या सर्व जरी उपलब्ध नसले तरी त्यांचे वचन साहित्याचे भांडार अमाप आहे. उपलब्ध असलेल्या वचनांतून, जास्त फिरून साधने गोळा करून मिळालेल्या वचनांतून हे प्रकरण तयार केले आहे. त्यांच्या वचनांचे अंकित कपिलासिद्ध मल्लिकार्जुन असे आहे. या वचनांतून त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांचे कविपण व्यक्त होते. काही वचने ब्रह्मांडाविषयी, परमेश्वराविषयी आहेत. आपल्या आराध्यदैवत मल्लिकार्जुनाशी त्यांनी साधलेला संवादही या विभागात स्पष्ट केला आहे. देह, देहाचे अस्तित्व, आध्यात्मिकता, भक्त इत्यादी विषय स्पष्ट होतात. सिद्धराम वीरशैव होते हे आपणास मान्य करावेच लागेल. कारण वीरशैवांचे अनेक शब्द त्यांच्या वचनांतून स्पष्ट होतात. त्यांची त्रिविधी प्रसिद्ध आहे. वीरशैवांचे षट्स्थल, अष्टावरण, पंचाचार इत्यादी शब्दांचे उल्लेख, त्यांचे विश्लेषण त्यांच्या वचनांतून व्यक्त होते. काम, क्रोध, मोक्ष इत्यादींची माहिती, सर्वात महत्वाचे म्हणजे स्वत:पासूनच आचरणात आणलेले सदाचाराचे मार्ग

सिद्धरामांनी सर्वसामान्यांना दाखवून दिले आहेत. एकता, समता, बंधुता, प्रेम, आदर, सदाचार इत्यादी मार्ग सिद्धरामांनी दाखविले. चन्नबसवण्णा, बसवण्णा, अल्लमप्रभू त्यांच्या वरही त्यांची वचने आढळतात.

सदाचार आणि सर्वधर्म समभाव असलेल्या सोन्नलगीत मकरसंक्रांतिच्या वेळेस त्यांच्या नावाने आजही जव भरली जाते. या जत्रेत ही समानता दिसून येते. भाविकांच्या मनात, हृदयात सिद्धराम आराध्य दैवत म्हणून विराजमान झाले, यात नवल ते काय ?

## सिद्धरामेश्वरांचे वीरशैवत्व

अनेक काव्य, ग्रंथ तसेच राघवांक व हरिहराचार्यरचित ग्रंथामध्ये सोन्नलगी हे छोटेसे होते असे म्हटले आहे. येथे गावचे पाटील कुडवक्कललिग जमातीच्या घरी सिद्धरामांचा जन्म झाला. मग असा प्रश्न निर्माण होतो की , ते कुडवक्कललिंग होते तर मग वीरशैव कसे झाले ? याला आधार, पुरावे काय ? त्याची चर्चा-

शैव म्हणजे म्हणजे स्थापित लिंगाची पूजा करणारे. इष्टलिंगाची करस्थलामध्ये पूजा करणारे ते वीरशैव. याविषयी अधिक माहिती आपण प्रकरण १ मध्ये पाहिली आहे. कर्नाटकामधील धार्मिक वातावरणात बसवण्णा, चन्नबसवण्णा, अक्कमहादेवी, अल्लमप्रभू इ. अनेक शिवशरण शरणी सामील होते. वीरशैव दर्शनाने १२ व्या शतकातील सर्व शैवसाधकांवर व्यापक असे प्रभाव पडले. काळामुख, पार्श्वपथ, कापालिक, कौलगळ (काश्मिर शैव) अशा सर्व शैव पंथाना आध्यात्मिक अन्वेषणामध्ये लपलेल्या मोक्षाने आकर्षित केले. यामध्ये हे वीरशैव दर्शन म्हणून यशस्वी झाले असा उल्लेख ( शिवशरणर चरित्रगळू भाग–२ प्रस्तावना प्र. ४३४४ आणि मत्तू बसवराज देवर रगळे स्थळ–९ प्र. ५६)[१] त्यावेळी बसवण्णांची किर्ती आणि वीरशैव धर्माचा प्रभाव भारतभर व्यापलेला होता असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही.[२]

याच काळामध्ये वीरशैव क्रांतीचे केंद्र असलेल्या कल्याणजवळील सोन्नलगीमध्ये असलेल्या सिद्धराम शिवयोगीवर वीरशैव दर्शनाचा प्रभाव पडला असे दिसते. निरंतरपणे आपल्या कर्मयोगामध्ये मग्न असलेल्या सिद्धरामांकडे अल्लमप्रभू आले. सिद्धरामांना प्रारंभीच्या जीवनामध्ये श्रीशैलमल्लिकार्जुनाचा साक्षात्कार झाला. त्या शक्तीच्या आधारावर सिद्ध लोककल्याणसाठी कर्मयोगाची दीक्षा त्यांनी घेतली. अज्ञानी लोकांना धर्माच्या मार्गावर आणण्यासाठी अनेक वचने गाऊन त्यांना सदाचाराने वागण्याचा उपदेश केला. अशा वेळेस अल्लमप्रभू सिद्धरामांना येऊन भेटले. हेच कारण कदाचित असेल की सिद्धरामांच्या जीवनात, त्यांच्या कार्यात महत्तपूर्ण बदल घडून आले. कर्ममार्ग सोडून सिद्धराम शिवयोग मार्गावर आल्याने त्यांना 'शिवयोगी' असे संबोधले जाते. तलावाच्या मध्यभागी ग्रहांतरमध्ये गुहा बनवून तेथे एकांतात सिद्धरामांनी समाधी घेतली.[३] महाकवी राघवांकाने 'सिद्धराम चरित्र' मधील सूक्ष्म विश्लेषणाने सिद्धरामांच्या जीवनाविषयी दोन मुखे आहेत असे सांगितले आहे.

एक म्हणजे त्यांचे प्रारंभिक जीवन ज्यामध्ये मल्लिकार्जुन मंदिर, स्थापित लिंगाची पूजा, इत्यादी शैव संप्रदायाची क्रिया. सिद्धरामांना श्रीशैल मल्लिकर्जुनानी कर्मयोगाची दीक्षा दिली आणि दुसरे म्हणजे अल्लमप्रभूंच्या भेटीनंतर ते वीरशैव धर्माने प्रभावित झाले आणि त्यांच्या जीवनामध्ये पूर्ण बदल झाला.[४] स्थावर लिंगाची पूजा सोडून ते इष्टलिंगाची साधना करू लागले. कारण स्थापन केलेले मल्लिकार्जुन मंदिर ( पूर्वीचे, किल्ल्यात होते) व परिसर यांच्याबद्दलचे वर्णन सिद्धराम चरित्र यामध्ये राघवांक कवीने (१३ वेशांक) केले आहे. अशा या वैभवसंपन्न मंदिराचे दिवस फिरले आणि त्याला अवशेषरूप प्राप्त झाले. सिद्धरामांच्या हयातीतच या मंदिराकडे खुद्द त्यांचेच दुर्लक्ष होण्याचे प्रसंग निर्माण झाले. अल्लमप्रभू आणि सिद्धरामांची भेट घडून अल्लमांनी सिद्धरामांच्या उपासना पद्धतीत बदल घडवून आणला. स्थावर लिंगपूजेकडून त्यांचे मन इष्टलिंग पूजेकडे वळविले[५] आणि त्यांना आपल्या सोबत बसवादी शिवशरणांच्या भेटीसाठी कल्याण येथे नेले. त्यामुळे पुढील आयुष्यात सिद्धराम आपणच निर्माण केलेल्या या कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिराकडे वळले किंवा नाही हे ठामपणे सांगता येत नाही. स्थावर लिंगाकडून इष्टलिंगपुजेकडे सिद्धरामांचे मन वळले म्हणून ते वीरशैव झाले असे संशोधनाद्वारे सिद्ध झाले.[६] अल्लमाच्या भेटीनंतर अल्लम आणि सिद्धराम यांच्यात झालेल्या आध्यात्मिक चर्चेचे अवलोकन 'शून्य संपादने' त केले असून अल्लम वाणीमध्ये वीरशैव दर्शन लपले आहे.[७] 'सिद्धराम चरित्रात' सिद्धरामांवर प्रभुदेवांच्या विचारांचे प्रभुत्त्व स्थापित झाले आहे हे लक्षात येते. आत्मस्वरूप साक्षात्काराला एंकांत जीवनाची आवश्यकता आहे. एकांतामध्ये व्यक्तिप्रज्ञा आत्मस्वरूपावर केंद्रीभूत होते. वीरशैव षटस्थलामध्ये हे क्रम दिसून येतात. आत्म्याचे अनंत चैतन्य गुरुकरूणेमुळे भक्तांच्या करस्थलाच्या इष्टलिंगात समाविष्ट होते.

इष्टलिंग गोपस्थापनेमुळे भक्तामध्ये प्राणलिंगाचा समावेश होतो. देहाच्या रोमारोमामध्ये लिंगभाव निर्माण होऊन निर्भय, लीन लिंगांग सामरस्याची स्थिती निर्माण होते.[८] प्रभुच्या बोलण्यात आर्त भाव, संताचे भाव, स्वानुभाव चिंतलेले आहे, असे राघवांकानी सांगितल्यावरून प्रभूचे विजय प्रत्यक्ष निदर्शनास येते.[९]

वीरशैव शिवशरण आणि शिवशरणींनी अनेक वचने रचली आहेत. वीरशैव शरणांमुळे वीरशैव नसलेल्या शरणांनी किती वचने रचली असतील ? या प्रश्नांच्या उलगड्याला जितकी शोध साधनसामग्रीची गरज आहे तेवढे सध्यातरी उपल्बध नाहीत. जसे सिद्धराम शिवयोगीच्या जीवनामध्ये देवालय, तलाव इ. अनेक कर्मयोग अनुष्ठान शक्य झाले. तसे पाहिले तर वीरशैव शरणांनी विशिष्ट अशी रचना चालविलेली होती. बांधलेले लिंग म्हणजे ( इष्टलिंग पूजा ) ही वीरशैवांची भाषा होय.

१२ व्या शतकातील कोणत्याही शरणांच्या जीवनविषयीची माहिती करून घ्यावयाची असेल तर खालील तीन वादविवादांचा अभ्यास करावा लागेल.

१) त्या शरणांनी आपल्या वचनातील अनुभव गीतामध्ये सांगितलेले चारित्रिक अंश.

२) त्या शरणाविषयी त्यांच्या समकालीन शरणांच्या अनुभव गीतांमध्ये सापडणारे चारित्रिक अंश.

३) त्या शरणांची जीवनयात्रा संपल्यानंतर त्यांच्याविषयी इतर कवीनी रचलेल्या काव्यकृतीमध्ये सापडणारे अंश.[१०]

वरीलप्रमाणे पहिल्या विवादामध्ये सिद्धराम आपल्याला लिंगदीक्षा चेन्नबसवण्णांकडून झाली हे स्वतःच्या वचनातून व्यक्त करतात. म्हणजे सिद्धरामांनी आपल्या वचनातील अनुभव गीतामध्ये स्वतःचे वीरशैवत्व स्पष्ट सांगितले आहे. कारण षटस्थल आणि अष्टावरणाबद्दल सिद्धरामांनी लेखन केलेले आहे आणि हे दोन्ही वीरशैवत्व स्पष्ट करणारे आहेत.

जसे - तन शुद्ध झाले माझे चन्नबसवण्णा कारणे
जीव शुद्ध झाला माझा बसवण्णांच्या कारणे
भाव शुद्ध झाला माझा प्रभुदेवांच्या कारणे
अशा या तन, जीव, भाव यात
इष्ट, प्राण, भाव लिंगाची खूण जाणून
झालो मी परवश आश्चर्याच्या अविगे
कपिलसिद्ध मल्लिनाथ[११]

वरील रचनेत गुरू तसेच षट्स्थलांचा उल्लेख आढळतो.

अनेक रचनेमध्ये सिद्धरामाविषयी कुतूहल शब्द असल्याचे दृष्टीला पडतात. सिद्धरामाविषयी त्यांच्या समकालीन शरणांच्या अनुभव गीतांमध्ये सिद्धरामांचे चारित्रिक अंश सापडतात असे म्हणावे लागेल. वरील दोन्ही विवाद बरोबर असतील. पण तिसऱ्या आकारामध्ये मात्र संशोधकात दुमत आहे. शरणांच्या जीवन यात्रेनंतर कवीनी रचलेल्या त्यांच्या लेखनात कितपत सत्यता आहे हे स्पष्ट करणे थोडे अवघडच आहे. म्हणून संशोधकात दुमत असेल यात शंका नाही, पण लिंगदीक्षा ही समस्या नाही असे स्पष्ट झाले आहे असे D.L. नरसिंहाचार्यांनी मान्य केले आहे. संशोधकांच्या मते लिंगदीक्षा झाली असे मत आहे. म्हणजे विरोधक आणि संशोधक यामधील ही दुमताची दरी अद्यापही कायम आहे.

सिद्धरामांच्या वीरशैवत्वाबाबत जो वाद आहे त्या वादाची चर्चा D.L. नरसिंहाचार्यांनी १९४१ च्या राघवांक कवी रचित 'सिद्धराम चरित्र' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत केली आहे. सिद्धराम वीरशैव होते हे सिद्धराम चरित्र आणि अनेक वीरशैव ग्रंथांवरून समजून येते,[१२] असे असूनही आज सिद्धराम शैव होते की, वीरशैव होते याबद्दल द्वंद्व चालू आहे. प्रथम ते स्थापित लिंगाची पूजा करीत होते. म्हणजे ते शैव होते असे म्हणावे लागेल, वीरशैव होते याला पुरावा म्हणजे वीरशैवांची भाषा, महेश, ज़ंगम, कायकवे कैलास, अष्टावरण आणि षट्स्थल लिंगाची भाषा हेच आधार होय. सिद्धराम शिवयोगी वीरशैव होते असा उल्लेख D.L. नरसिंहाचार्यांनी राघवांकरचित सिद्धराम चरित्र्याच्या प्रस्तावनेत स्पष्ट केलेला आहे. सिद्धरामांच्या जन्मानंतरचे जातकर्म,

मल्लिकार्जुन देवालय, तसेच इष्टलिंगपूजा इत्यादी माहितीवरून ते वीरशैव होते असे जास्त प्रमाणात मानावे लागेल. राघवांक कवीनेही हे मत मांडल्याचे दिसून येते. तसेच सिद्धरामांचे वीरशैवत्व एम. आर. श्री यांनी 'शून्य संपादने' च्या आधारावर स्पष्ट केले आहे. ही माहिती एम. आर. श्री यांनी आपल्या पाच संकलनामध्ये स्पष्ट केली आहे.[१३] शून्य संपादने लिहिणाऱ्यांनी वीरशैवत्व हे विषय खरे आहे असे म्हटले आहे,[१४] तर काहीजण कल्पना करून लिहिलेले आहे असे म्हणतात. D.L. नरसिंहाचार्यांनी मात्र सिद्धराम वीरशैव होते यात संशय नाही असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. या विमर्शाला आर. सी. हिरेमठांनी मान्यता दिली आहे. 'शैवसाम्राज्य' हे पद सिद्धराम शैव होते असे अर्थ केले तर हरिहरांनी बसवराज देवर रगळे मध्ये हे पद बसवण्णांनी संबोधले आहे. मग बसवराज (बसवण्णा) हे तर वीरशैव होते मग हेच पद सिद्धरामानांही देण्यात आले होते तर मग सिद्धराम शैव कसे होऊ शकतील ? येथे पुन्हा प्रश्न निर्माण होतो. सिद्धरामचरित्रा मध्ये षट्स्थलांचा उल्लेख आहे आणि या षट्स्थलामुळेच त्यांचे वीरशैवत्व स्पष्ट होते. हे शब्द वीरशैवांचे घोतकच आहेत. स्थावरलिंग पूजा, होम आणि जातकर्म इत्यादी गोष्टीवरून ते शैव होते असे समजते पण नंतर त्यांच्या मध्ये बदल होत गेले असे आपण वर पाहिले आहे. काही वचनांमध्ये सिद्धरामांनी स्वतःच हे कबूल केले आहे .

हरिहर आणि राघवांक यांनी अनेक चरित्रे रचलेली आहेत. याला कारण ते त्या काळचे शिवशरण व शरणीचे जवळजवळ समकालीन म्हटले तरी फारसा फरक पडत नाही. कारण त्यांच्या कृतींमध्ये प्रभुत्व असे आधार होते. ते आधार पुढीलप्रमाणे- जसे पंचकळसाच्या साक्षीने वीरशैव दीक्षा घेतात. शैव अग्नीच्या साक्षीने दीक्षा घेतात. पण सिद्धरामांना पंचकळसाच्या साक्षीने दीक्षा दिली गेली. म्हणून ते वीरशैव होत.

बाल्यावस्थेतच सिद्धराम शिवयोगींना उत्तम मार्गात दिव्य लिंगाची प्राप्ती झाली होती. असे राघवांक सांगतात. राघवांकाच्या काव्यामधून सिद्धरामांना चेन्नबसवण्णांच्या हस्ते कल्याण येथे लिंगदीक्षा झाली असे वर्णन केले आहे. लिंगदीक्षा झाली हे राघवांक कबूल करतात पण सिद्धराम शिवयोगी कल्याणला गेल्याबाबत मात्र मौन धरल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. एका आख्यायिकेप्रमाणे सिद्धरामांशी विवाह करण्याची कुंभारकन्येची इच्छा होती त्यावेळेस त्यांनी सतीला सतीने वरणे कसे शक्य आहे? असा प्रश्न निर्माण करून वीरशैवांच्या शरणस्थल, संपत्तिभाव, भक्ती व्यक्त केली आहे. डॉ. आर. सी. हिरेमठांनी सुचविलेली हे विषय वीरशैवत्वाला साध्य आहे यात शंका नाही. सिद्धराम शिवयोगी होते असे म्हटले तर हे शब्द फक्त वीरशैव धर्माच्या तत्वाला अनुसरून आहे.[१५] शिवयोगीचे कायक असे काव्य सिद्धरामाचे वीरशैवत्व सिद्धराम चरित्रामधून स्पष्ट होतात.[१६] असे आर. सी. हिरेमठ यांनी सांगितले आहे. सिद्धराम शिवयोगी होते असे संशोधकानीच नावे तर स्वतः सिद्धरामांनीच एका वचनातून व्यक्त केले आहे.

लाभले नीललोचनेस लिंगपूजा केल्याचे फळ,

लाभले बसवण्णास जंगमपूजा केल्याचे फळ,

लाभले अजगण्णास मंत्रपूजा केल्याचे फळ,

लाभले शिवयोगी सिद्धरामास

योगाची पूजा केल्याचे फळ

देखा कपिलसिद्ध मल्लिकार्जुन ।[१७]

वीरशैव काव्यरंभामध्ये पूर्वरचनेत गुरू चेन्नबसवांनी महान वाटणारे सिद्धरामांना शरणार्थी असे म्हटले आहे. त्यांच्याकडून शरणार्थी पण स्वीकारणारे सिद्धराम वीरशैव नव्हेत तर मग कोण? अक्कहादेवीनी सुद्धा सिद्धरामांना तू जंगम आहेस सिद्धरामैय्या असे संबोधिले आहे. स्वत: सिद्धराम घनगुरू चन्नबसव म्हणून चन्नबसवण्णा स्वत:चे गुरू म्हणून सांगितलेली गोष्ट वर सांगितली असून ती वैशिष्ट्य पूर्ण आहे. असे आर. सी. हिरेमठाचे मत आहे.[१८]

प्रख्यात असलेल्या जगद्गुरू सिद्धरामांना, वयाने लहान असलेल्या चेन्नबसवण्णांनी दीक्षा दिली हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला स्वत:ला त्या महागुरूचे शिष्य म्हणवून घेणारे जन आता २० व्या शतकामध्येही आहेत. सोलापूर सिद्धेश्वर ग्रंथ प्रकाशनांनी अलीकडे प्रकाशित केलेले 'प्रभु देवर रगळे' यास साक्ष आहे. असे म्हणता येईल. अल्लमप्रभूंना इष्टलिंग देणारे सोन्नलगी मधील अनिमिषीयोगी म्हणविणारे प्रख्यात सिद्धराम होय. सिद्धरामाद्वारे दीक्षा घेऊन सिद्धरामाद्वारे त्यांना इष्टलिंग दीक्षा देऊ केली. कल्याणला जाऊन आठ वर्षाच्या चेन्नबसवण्णांना घेऊन सिद्धरामाद्वारे त्यांना इष्टलिंग दीक्षा देऊ केली. कल्याण क्रांती झाल्यानंतर शरणशरणी सिद्धरामांच्या आश्रयाला पळून आले असे मत अत्यंत जीर्ण झालेल्या जुन्या काही प्रतीवरून प्रकाशनांनी मांडले आहे आणि त्यांचे असेच मत आहे.[१९]

अनेक वचनावरून शिवयोगी कल्याणला गेले होते, तसेच बसवण्णांची कीर्तीही वचलनातून स्पष्ट होते. तसेच होमनेम हे विधी सिद्धराम प्रथम करीत होते पण नंतर इष्टलिंग दीक्षा झाल्यानंतर ते इष्टलिंग साधक बनले. 'योगीकुल चक्रवर्ती' म्हणजे योगींयांचा योगी, शिवयोगी असे सिद्धरामांना संबोधण्यात आले. शिवयोगी म्हणजे शिव किंवा शंकर असा अर्थ होतो आणि लिंग ही शिवशंभू महदेवाची प्रचिती मानली जाते. म्हणून इष्टलिंगाची पूजा करणारे वीरशैव असे म्हणतात. सिद्धरामांच्या विधिनियमांमध्ये बदल घडून त्यांनी इष्टलिंगाची पूजा केली आणि शिवयोगी बनले ते वीरशैव झाले यात काही शंका नाही असे संशोधिकेला वाटते.

सिद्धरामांनी चेन्नबसवण्णा यांना गुरू म्हणून स्वीकारल्याविषयीची दोन वचने एम. बी. कोट्टरशेट्टी सरांनी त्यांच्या ग्रंथात पान.११३ मध्ये दिली आहेत. हे दोन्ही वचनाचे सुचविलेले अंक ''सिद्धरामेश्वर देवर निरुपिसीद षट्स्थल वचनगळू'' या पुस्तकातून घेतले आहे.[२०]

सिद्धराम पहिल्यांदा आपले आराध्यदैवत (स्थापितलिंग) कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाचे उपासक होय. होमहवन हेही नित्य कर्म चालू होते. हे शैवाचे कार्य होत. म्हणून त्यांना शैव म्हणावे लागेल. पण अल्लमभप्रभु

आणि सिद्धराम यांची भेट झाल्यानंतर बसवण्णांच्या ''सर्व धर्म समभाव'' वर आधारित असलेल्या अनुभव मंटपातील चर्चा, चेन्नबसवण्णांकडून लिंगदीक्षा, यानंतर त्यांच्या उपासनेत प्रचंड बदल झाला. मग ते स्थापितलिंगाची पूजा न करता इष्टलिंग पूजा करून शिवयोगात मग्न होऊ लागले. राणी चामला व आण्णा बोम्मय्या यांना सुद्धा त्यांनी लिंगदीक्षा दिली, अशा प्रकारे कल्याण क्रांतीनंतर सर्व वचन साहित्याच्या रक्षणाचा भार सिद्धरामांवर चेन्नबवण्णांनी घातला. सर्व शरण शरणी कल्याण सोडून निघून गेले. पण आपल्या गुरू आज्ञेप्रमाणे सिद्धराम मात्र स्वत: समाधी घेईपर्यंत सोन्नलगीत राहूनच आपल्यावर सोपविलेले कार्य करू लागले. अशा प्रकारे त्यांचे वीरशैवत्व स्पष्ट करता येते.

## सण (सकरसंक्रात) आणि महोत्सव

सण आणि महोत्सवाची माहिती पाहण्यापूर्वी सिद्धरामांचा संदेश, योग साधनेच्या उच्च स्थितीप्रत पोहोचल्याचे सिद्धरामांनी सात्विक अभिमानाने सांगितले आहे.—

भक्त झाल्यास व्हावा, बसवण्णासारखा,
जंगम झाल्यास व्हावा, प्रभुदेवासारखा,
भोगी झाल्यास व्हावा, चेन्नबसवण्णासारखा,
योगी झाल्यास व्हावा, मजसारखा
कपिलसिद्ध मल्लिनाथा ( सिद्धराम वचन सं. नं. ९१६ )[२१]

इष्टलिंग पूजा कशी करावी याविषयी सिद्धप्रभु सांगतात.

तलावाचे पाणी, वेलाचे पुष्प वाहिल्यास काय त्याचे थोरपण ?
होईल का होईल का लिंगार्चन ?
पाणी ओतण्यास तो उन्हाने थकला आहे काय ?
पुष्प वाहण्यास तो विलासी पुरूष असे काय ?
तुझिया मनाच्या पाण्याने, ज्ञानाच्या पुष्पाने
केल्यास पूजन, तुज रे म्हणेन भक्त महेश्वर
कपिलसिद्ध मल्लेश्वर (सि. व. सं. नं. ११९०)

आळशी न होता सर्वांनी सत्य शुद्ध कार्य करीत कर्मयोगाने चित्त शुद्ध करावे. बाह्यावडंबर सोडून सदाचारी होऊन ईश्वराठायी अचल श्रद्धा ठेवावी. सर्व प्राणि मात्रावर दया करावी, असा योगीराजांचा संदेश आहे.

वर काही अशा गोष्टी आपण पाहिल्या आहेत की, ज्यावर माणसांचा सहजासहजी विश्वास बसणार नाही. सिद्धरामांनी अनेक चमत्कार केले, असे आपणाला अनेक पुस्तकातून वाचण्यास मिळते. जातिभेद, धर्मभेद न मानता सदाचार मार्गावर चालणारी व्यक्ती ही सिद्धरामाची आवडती असे, त्यांचा सर्व भार पाप पुण्यावर न राहता सदाचारावर आधारित होता. याचीच प्रचिती आजही त्यांच्या नावाने भरल्या जाणाऱ्या सोन्नलगी (सोलापूर) येथील जत्रेत जाणवते किंवा दिसून येते. या जत्रेत तसेच, सर्व विधि नियमांमध्ये अनेक जाती-धर्माचा समावेश आजही आहे.

मकर संक्रांतीच्या वेळी पाच दिवस सोलापूरात शिवयोगी सिद्धरामेश्वरांची मोठी जत्रा भरते. त्यावेळी नंदीध्वजाची मिरवणूक निघते त्यावेळेचा उत्सव पाहण्यासारखा असतो. श्रावण महिन्यातही सिद्धेशांचा उत्सव मोठ्या थाटाने होत असतो. ज्यावेळी नंदीध्वजाची मिरवणूक निघते. धार्मिक भावनेतून, भक्तीश्रद्धापूर्वक आचारात असलेला हा उत्सव महायोगी सिद्धरामांचा जयंती महोत्सव होय. क्रांतियोगी बसवेश्वरांनी प्रतिपादिलेल्या जात, मत, पंथ भेदभावरहित समाज निर्मितीचे तत्वे सिद्धरामेश्वरांनी आचरणात आणलेली मकर संक्रांतीचा सण साजरा करताना दिसून येतात. हि जत्रा नवीन वस्त्रे घालून केवळ मौजमजा करण्याची नव्हे तर धार्मिकतेच्या भावनेतून भक्ती श्रद्धापूर्वक आचरण्याचा हा उत्सव आहे.[२२]

### नंदीध्वज :-

या उत्सवात वेगवेगळ्या जातीतील लोक ांना प्रतिनिधीत्व दिलेले दिसून येते. पाच नंदीध्वज पाच जातीतल्या लोकांचे असतात.



१) हिरेहब्बू २) देशमुख ३) माळी ४) फुलारी ५) सोनार

शिवाय दोन नंदीध्वज दलित समाजांची असतात.[२३] अशा प्रकारे सर्व समाजातील, जातिधर्मातील लोक यात्रेत आणि यात्रेतील सोहळ्यात सहभागी होतात. आता नंदीध्वज म्हणजे काय? असा प्रश्न पडतो नंदीध्वज म्हणजे बसवध्वज म्हणजेच तत्वाची पताका. बसवेश्वरांची श्रेष्ठता दर्शविणारे हे ध्वज होत.[२४] असा उल्लेख केला

जातो. तर नंदीध्वज म्हणजे योगदंड असा उल्लेख स्पष्ट जरी नसला, तरी योगदंडाशी विवाहाची जी कथा सांगितली तेव्हा नंदीध्वज म्हणजे योगदंड असा उल्लेख मिळतो.

श्री सिद्धरामेश्वरांची वचने खंड-१, या पुस्तकात यात्रा व परंपरा या प्रस्तावनेत सिद्धरामाच्या विवाहाविषयीची माहिती व अक्षता सोहळ्याचे वर्णन केलेले आहे. कुंभारकन्येची सिद्धरामांबरोबर लग्न करण्याची इच्छा होती. तेव्हा योगदंडाशी लग्न करावे असे सिद्धराम सांगताच तिचे लग्न योगदंडाशी केले जाते. व सिद्धरामांनीच मंगलाष्टके म्हटली [२५] असा उल्लेख आढळतो. काही लोकांची अशी समजूत आहे की, नंदीध्वज म्हणजे सिद्धरामांचा योगदंड. पण ही समजूत चुकीची वाटते कारण–कोणीही योगसाधक आपला योगदंड कुणालाही दिल्याचे दिसून येत नाही. योगदंड हे त्याच्या तपश्चर्येचे साधन असते. कोणत्याही ग्रंथात आपला योगदंड कोणालाही दिल्याचे दिसून येत नाही. मकरसंक्रांतीच्या पहिल्या दिवशी भोगी असते. त्या दिवशी सर्व नंदीध्वज मिरवणुकीने देवालयाच्या आवारातील सम्मती कट्ट्याजळ आणण्यात येतात.[२६] नंदीध्वज हे सुमारे २०-२५ फुट उंच असून त्यांचे वजन कित्येक किलो असते. हा नंदीध्वज कनरेला आवळून बांधलेल्या पटोड्यात (म्हणजे नंदीध्वज अडकविण्यास खास विणलेला बेल्ट) अडकवून तोल सांभाळून चालण्याचे काम फारच अवघड आणि कष्टाचे असले तरी भक्तगण मोठ्या श्रद्धेने, निष्ठेने व उत्साहाने करतात. नंदीध्वज धरणाऱ्या भक्तांनी विशिष्ट गणवेश करावा लागतो. म्हणजे पांढरे शुभ्र धोतर, पांढरीच बाराबंदी आणि पांढराच रूमाल असा पोषाख केलेल्यानाच नंदीध्वज धरण्यास परवानगी असते.[२७] मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो, संक्रातीच्या दिवशी विद्युत रोषणाईने सजलेली नंदीध्वजाची ही मिरवणूक पाहणाऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फिटते. मन भरून येते. सम्मती कट्ट्याजवळ अक्षता कार्यक्रम होतो. त्यावेळी मानकरी शेटे घराण्यातील एकजण सिद्धरामेश्वरांची पाच वचने म्हणतो, कपिलसिद्ध मल्लिकार्जुना साक्षीने ''इदं इदं सत्य सत्यं'' म्हटल्यावर भक्तगण पाच वेळा अक्षता टाकतात.[२८] हाच लग्न सोहळा असे म्हणतात. पण हे कितपत सत्य आहे? खरे तर त्याचे तात्पर्य काय असेल ? असेही सांगितले जाते.

सिद्धरामेशांनी बसवेशांची तत्वे विषद करून कपिलसिद्धमल्लिकार्जुन साक्षीने हे खरे आहे असे म्हणताच भक्तगण आपली सम्मती दर्शविण्याकरिता अक्षता टाकतात.[२९] यालाच अक्षता सोहळा म्हणतात असे आहे. कारण जर हा विवाह सोहळा मानला तर हे कसे शक्य आहे ? वर अगोदर सांगितल्याप्रमाणे सिद्धराम ब्रह्मचारी होत. ते अनुभव मंटपाच्या शून्यपीठाचे तिसरे उत्तराधिकारी होते. असे आपणास अनेक ग्रंथांवरून आणि हरिहर सिद्धराम देवर रगळे वरून समजते. कारण शून्यपीठाचे (अनुभव मंटपाचे) पहिले अधिकारी अल्लमप्रभू दूसरे उत्तराधिकारी चेन्नबसवण्णा हे होते. दोघेही ब्रह्मचारी होते. म्हणून ब्रह्मचारी असणारी व्यक्तीच तिसरी उत्तराधिकारी म्हणून निवडली गेली आणि अशा प्रकारे अनुभव मंटपाचे तिसरे उत्तराधिकारी हे सिद्धरामेश्वर होते

हे अनेक ग्रंथांवरून समजते. वरील लग्नसोहळा हा कदाचित त्या कुंभारकन्येच्या मनातील विचार काढण्यासाठी केलेली कल्पना असावी. सिद्धराम ब्रह्मचारी होते याविषयी याच प्रबंधात सविस्तर माहिती आलेली आहे.

दुसऱ्या दिवशी (सणादिवशी) होमकुंडात होम हा विधी पार पाडला जातो. आता होम म्हणजे काय तर याचा उलगडा पूर्ण होत नसला तरी कुंभारकन्येला अक्षता सोहळा नंतर योगदंडाला पवित्र तळ्यात स्नान घालण्यात आले. कुंभारकन्या सचैल स्नान करून सौभाग्यलेणे लेऊन सती जाण्यास सिद्ध झाली. होमकुंडात रात्री अग्निकाष्ठे भक्षण करून ती सती गेली असे म्हटले जाते. पण सिद्धराम हे भुकेलेल्यांना अन्नदान करणारे, जीवनदान देणारे होते, तर आपल्या समोर एक स्त्री सती जात आहे हे ते कसे होऊ देतील? असा प्रश्न पडतो. याचा उलगडा अगोदरच्च्या पाठात दिलेला आहे, मनातील कामना व वासनेचा अंत करावयास सिद्धरामांनी कुंभारकन्येला सांगितले होते. पण आता असे म्हटले जाते की , होम हा कार्यक्रम म्हणजे कुंभारकन्येने होमकुंडात घेतलेली आहुती/उडी होय आणि हा सोहळा म्हणजे सणादिवशी साजरा केला जातो. आजही अति उत्साहाने सिद्धरामांचे भक्त हा सोहळा जात-पात वा धर्म न मानता एकत्रित येऊन साजरा करतात. सिद्धरामेश्वरांना दैवतरूप लाभल्यामुळे ते सोलापूरतील आराध्य दैवत झाले आहेत. या यात्रेत महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र या राज्यातील लक्षावधी भाविक मोठ्या श्रद्धेने व संख्येने सहभागी होतात.[३०]

सणाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे होमविधीच्या दुसऱ्या दिवशी दारूकाम हा कार्यक्रम साजरा केला जातो. या शोभेच्या दारूकामामध्ये प्रथम येणाऱ्यास बक्षीसही ठेवण्यात येते. होम या विधीला जेवढी भाविकांची गर्दी असेल त्याच्या तिप्पट-चौप्पट भाविक अक्षता आणि शोभेचे दारूकाम पाहण्यास हजर असतात. हे भाविक मोठ्या श्रद्धेने आणि भक्तिभावाने येतात.

असे म्हटले जाते की, सिद्धराम माउलीच्या अनुपम दैवी शक्तीने अनेकांच्या जीवनात दैवी चमत्कारांचे अनुभव आलेले आहेत. आजही येत आहेत. सणाच्या पूर्वी सिद्धरामांचे भक्त आपापली घरे शूचिर्भूत करून पाच दिवस देवाच्या नावाने नंदादीप लावतात. पाचही दिवस अळणी उपवास करतात. पाच दिवस न चुकता सिद्धरामेश्वरांच्या दर्शनास जातात. संबंध वर्षभर दर्शनास जाणाऱ्या भक्तांची संख्याही मोठी आहे. दूरदूरहून भाविक भक्त सोलापूरला येऊन वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या या सणात सहभागी होतात. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात एक महिनाभर चालणारी शिवयोगी सिद्धरामेश्वरांची जत्रा अव्दितीयच आहे.[३१] अशा प्रकारे सामाजिक पार्श्वभूमी लाभलेल्या, अध्यात्माच्या मार्गावर प्रत्यक्ष आपल्या आचरणाने दाखवून देणारे सोलापूरचे श्रीसिद्धरामेश्वरदेव प्रत्येक व्यक्ती आणि भाविक यांच्या हृदयात आराध्य दैवत म्हणून विराजमान झाले. अशा प्रकारे कळत नकळत सिद्धरामांनी सोन्नलगी (सोलापूर) तील सामाजिक जीवनावर परिणाम केला आणि आता संक्रात धार्मिकतेच्या दृष्टीने साजरा केला जातो. हे आजच्या सोन्नलगीतील प्रत्येक व्यक्तिच्या जीवनातील सिद्धरामांचे योगदानच म्हणावे लागेल.

श्री शिवयोगी सिद्धरामेश्वरांचे चरित्र व तत्त्वज्ञान अभ्यासत असताना काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्माची ओढ लागली होती. त्यामुळे तेव्हापासूनच त्यांनी अभ्यास व ध्यान यांच्या व्दारे अध्यात्माच्या क्षेत्रात प्रगती केली. त्यांना झालेला परमेश्वराचा साक्षात्कार त्यांच्या भावी जीवनाची दिशा ठरविणारा होता. प्राचीन काळात भगवान महावीर, गौतम बुद्ध या महान धर्माचार्यांना केवल ज्ञानप्राप्ती झाली असे समजले जाते. तसाच साक्षात्कार श्रीसिद्धरामेश्वरांनाही झाला असावा. त्यामुळेच इतरांपेक्षा वेगळा असा जीवनाचा मार्ग त्यांनी पत्करला.

या मार्गामध्ये केवळ स्वत:ची आध्यात्मिक प्रगती एवढाच भाग नव्हता. तर सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजासाठी मंदिरे तलाव, लिंगस्थापना, अष्टविनायक या गोष्टी त्यांनी केलेल्या दिसतात. तसेच स्वत:ला झालेल्या ज्ञानाचा इतरांनाही उपयोग व्हावा यासाठी त्यांनी उपदेश व वचने लिहून ते ज्ञान सर्वांपर्यंत जावे यासाठीही प्रयत्न केलेला दिसतो. 'शहाणे करावे सकल जन' या उक्तीप्रमाणे स्वत:चे ज्ञान स्वत:पुरते मर्यादित न ठेवता त्यांनी त्या ज्ञानाचा प्रसार केला आहे. म्हणूनच केवळ वीरशैव समाजातच नव्हे तर सर्वच जातिपंथांना ते आदरणीय ठरले आहेत.

हे कार्य करीत असताना त्यांना अनेक अडचणींना व संकटांना सामोरे जावे लागले. विरोधकांनी त्यांच्यावर अनेक आरोप केले, त्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला पण न डगमगता त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. स्वत:च्या कार्यावर त्यांचा विश्वास तर होताच पण इतर सामान्यजनांनाही विश्वास वाटावा आणि विरोधकांना निरूत्तर करावे यासाठी त्यांनी काही चमत्कार दाखविले अशा कथाही ठिकठिकाणी आल्या आहेत. गौतम बुद्धांनाही अशाप्रकारे विरोध झाला त्यावेळी त्यांनीही असे भौतिक चमत्कार दाखविले होते अशा कथा आहेत. त्या त्या काळातील विरोधकांना निरुत्तर करण्यासाठी या महात्म्यांना आपले यौगिक सामर्थ्य नाईलाजाने दाखवावे लागले होते. तसेच काहीसे श्री सिद्धरामेश्वरांच्या संदर्भातही घडले असावे. विशेषत: कुंभार कन्येचा प्रसंग त्यांच्या दृष्टीने त्यांच्यावरील आध्यात्मिक संकट होते. पण त्यांनी याही कठीण प्रसंगाला त्यांच्या विचारांच्या साहाय्याने यशस्वीपणे तोंड दिले.

श्री सिद्धरामेश्वरांचे विचार आजही वीरशैव संप्रदायाला व एकूणच समाजाला मार्गदर्शक आहेत. त्यांची वचने या दृष्टीने अतिशय महत्वाची आहेत. त्यांच्या या कार्यामुळेच मकर संक्रातीच्या निमित्ताने साजरी होणारी जत्रा हा त्यांनीच दिलेला वारसा आहे. या नंदीध्वजाच्या आणि अक्षता सोहळ्याच्या रूपाने त्यांचे चरित्रच त्यांच्या भक्तांच्या डोळ्यासमोर राहावे असा हा वारसा आहे. आजही सोलापूरातील सर्व जाती पंथाचे लोक श्रीसिद्धरामेश्वरांची भक्ती करतात आणि श्रद्धेने त्यांच्या समाधीची पूजा अर्चा करतात.

## प्रकरण ५ वे तळटिपा

| | | |
|---|---|---|
| १) | कोट्टरशेट्टी एम. बी, | सिद्धराम शिवयोगी, कन्नड अध्ययन पीठ, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड; सन १९७५, पृ. क्र. ८९ |
| २) | कित्ता , | पृ.क्र. ८९ |
| ३) | कित्ता , | पृ.क्र. ९० |
| ४) | कित्ता , | पृ.क्र. ९० |
| ५) | कुंभार आनंद, | संशोधन तरंग, प्रभाकर देसाई, सोलापूर १९८३ पृ.क्र. १४८ |
| ६) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी पृ.क्र. ९२ |
| ७) | कित्ता , | पृ.क्र. ९१ |
| ८) | कित्ता , | पृ.क्र. ९१ |
| ९) | कित्ता , | पृ.क्र. ९२ |
| १०) | कित्ता , | पृ.क्र. ९२, ९३ |
| ११) | कित्ता , मडकी शशिकला | श्री सिद्धरामेश्वर वचनांजली, बसव महामने चॅरिटेबल ट्रस्ट बसवमंटप, राजाजी नगर बेंगळुरू, सन १९९३ पृ.क्र. ११८ |
| १२) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी पृ.क्र. ९४ |
| १३) | कित्ता, | पृ.क्र. ९५ |
| १४) | कित्ता, | पृ.क्र. ९६ |
| १५) | कित्ता , | पृ.क्र. ९७ |
| १६) | कित्ता , | पृ.क्र. ९८ |
| १७) | कित्ता , मडकी शशिकला | सिद्धरामेश्वर वचनांजली पृ.क्र. १०२ |
| १८) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी पृ.क्र. १०२ |
| १९) | कित्ता , | पृ.क्र. १०८ |
| २०) | कित्ता , | पृ.क्र. ११३ |
| २१) | मडकी शशिकला | सिद्धरामेश्वर वचनांजली, पृ.क्र. २६ |
| २२) | कित्ता, मडकी शशिकला | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, बसवसेंटर, राजकला मार्ग, मंगळवार पेठ, सोलापूर २००१ पृ.क्र. १२५ |
| २३) | कित्ता, मडकी शशिकला | सिद्धरामेश्वर वचनांजली पृ. क्र . १४ |

| | | |
|---|---|---|
| २४) | कित्ता, मडकी शशिकला | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत पृ.क्र. १२६ |
| २५) | डॉ. पसारकर शें. दे, | श्री. सिद्धरामेश्वर वचनखंड भाग- १, श्री. सिद्धेश्वर देवस्थान, पंचकमिटी, सोलापूर १९९८ (पृ.क्र. प्रस्तावना ११) |
| २६) | कित्ता, मडकी शशिकला | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत पृ.क्र. १२६ |
| २७) | कित्ता, मडकी शशिकला | सिद्धरामेश्वर वचनांजली पृ.क्र. १४ |
| २८) | कित्ता, मडकी शशिकला | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत पृ.क्र. १२६ |
| २९) | कित्ता, | पृ.क्र. १२६ |
| ३०) | कित्ता, पसारकर, | श्री. सिद्धरामेश्वर वचनखंड भाग – १ (पृ. क्र. प्रस्तावना१२ ) |
| ३१) | कित्ता, मडकी शशिकला | सिद्धरामेश्वर वचनांजली पृ.क्र. १५ |